जाहिर प्रकटन

कोकण विभागातील नागरीकांना जाहिर आवाहन करण्यात येते की, समान नागरी कायद्याबाबत (UCC) विविध हितसंबंधी गट, संस्था व नागरिकांच्या सूचना, हरकती आणि मते जाणून घेण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समिती द्वारे कोकण विभागाच्या जनसुनावणीचे आयोजन **विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई** येथे आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदर जनसुनावणीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	दिनांक	जिल्हा	वेळ	स्थळ
१	२१.११.२०२६	मुंबई शहर	११.०० ते १२.००	१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, समिती सभागृह, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई (समक्ष) २) संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय (व्ही.सी.व्दारे)
२		मुंबई उपनगर	१२.३० ते १.३०	
३		पालघर	३.०० ते ४.००	
४		सिंधुदुर्ग	४.३० ते ५.३०	
१	२२.११.२०२६	ठाणे	११.०० ते १२.००	
२		रायगड	१२.३० ते १.३०	
३		रत्नागिरी	३.०० ते ४.००	

संबंधित गट, संस्था यांचे प्रतिनिधी आणि नागरिक यांना कोकण विभागीय आयुक्त यांचे कार्यालय/ संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय येथे निर्धारित दिवशी, निर्धारित वेळेपुर्वी १ तास सुनावणीकामी समक्ष उपस्थित राहता येईल. विभागीय आयुक्त कार्यालयातील उपस्थितांची सुनावणी समितीसमोर समक्ष घेण्यात येईल व जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या नागरीकांची सुनावणी व्हि.सी.व्दारे घेण्यात येईल.

तसेच ज्या नागरीकांना केवळ ऑनलाईन पध्दतीने आपले मत सादर करावयाचे आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या https://ucc.maharashtra.gov.in/ या पोर्टलवर ३७ मुद्दयांची माहिती देता येईल.

सही/-xxx
(रूबल अग्रवाल)
विभागीय आयुक्त कोकण विभाग

Scanned with OKEN Scanner